नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 08/09/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## फसवणुक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 1 कि.मी. अंतरावरील कांचनगंगा लेआउट कळमेश्वर येथे दिनांक 08/05/2021 चे 15.00 वा. ते 21.06 वा. दरम्यान अज्ञात आरोपीने त्याचे मोबाईल वरून मित्र शर्मा नाव असे सांगुन फिर्यादी नामे– केशव दशरथ गणोरकर वय 58 वर्ष, रा. प्लॉट नं. 30 कांचनगंगा लेआउट वार्ड क्र. 1 ब्राम्हणी कळमेश्वर यांचा विश्वास संपादन केला. यानंतर अज्ञात आरोपीने फिर्यादीला म्हटले की, ''पैश्यांची गरज आहे, माझे कडे पैसे नाहीत, मला दुसऱ्याला पैसे पाठवायचे'' असे सांगुन आरोपीने ''तुम्हाला अगल्या व्यक्तीचे खात्याची लींक पाठवितो, त्यावर मी 5 रूपये टाकतो, तुम्ही व्हेरीफाय करने करीता दिलेल्या लींक वर 5 रू टाका'' असे सांगीतल्यावरून आरोपीने दिलेल्या लींक वर फिर्यादीने 5 रूपये पाठविले. तेव्हा आरोपीने पैसे नाही आले म्हणुन फिर्यादीस कळविले. त्यानंतर फिर्यादीने पुन्हा लहान मुलाचे हाताने त्याचे मोबाईलवरून फोन–पे द्वारे 5 रूपये पाठविले. तेव्हा सुद्धा शर्माने उशीरा येईल असे म्हणुन दुसरी लींक फिर्यादीचे मोबाईलवर पाठवुन 9,999 रू टाकण्यास सांगीतले. तेव्हा फिर्यादीचे लहान मुलाने दिलेल्या लींक वर 9,999 रू सेन्ट केले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीस फोन करून म्हटले की, ''तुमची 1 रिक्वेस्ट झाली आहे, ही रिक्वेस्ट कम्प्लीट करने करीता आणखी 4 ट्रान्सजेक्शन करावे लागतील, नाहीतर जे पैसे फिर्यादीने पहील्या रिक्वेस्ट ला पाठविले ते ब्लॉक होवुन जाणार'' म्हणुन फिर्यादीचे लहान मुलाने, फिर्यादीचा ओळखीचा शर्मा नावाचा मित्र आहेत म्हणुन विश्वास ठेवुन, त्याचे सांगण्याप्रमाणे 9,999/–रू. चे 3 ट्रान्सजेक्शन आणि 19,999/–रू. चे 2 ट्रान्सजेक्शन असे एकुण 5 ट्रान्सजेक्शन करून रक्कम एकुण 69,995/–रू. चा शर्माने पाठविलेल्या वेगवेगळया लींकवर पाठविले. अशाप्रकारे अज्ञात आरोपीने मित्र शर्मा नाव असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करून फसवणुक केली आहे. स्टेट बॅक ऑफ इंडीया, शाखा कळमेश्वर येथील मॅनेजर यांचेशी फिर्यादीने चर्चा केली असता, त्यांनी फिर्यादीस कळविले की, ''तुमचे पैसे वापस मिळतील, त्याचप्रमाणे फोन–पे येथे त्यांचे सांगणप्रमाणे पुर्ण प्रोसीजर झालेली आहे, बॅकेची प्रोसीजर पुर्ण झाल्यावर फिर्यादीस पैसे परत मिळु शकते. फिर्यादीस त्याचे पैसे परत मिळतील म्हणुन, त्यावेळी फिर्यादीचे निराकरण झालेले होते. परंतु फिर्यादीस अद्यापपावेतो पैसे परत मिळालेले नाहीत.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 (क)(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. ठाकुर मो.क्र 9422884815 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर